**SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.**
**Affiliation No. 1130703**
**Academic session 2024-25**
**NOTES- 10 (TERM-2)**
**Subject - Marathi**

**std.7th**

**Prepared by: Renuka Joshi** **LESSON- १०.आमची सहल**

---

- **पूर्व उपक्रम – तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही पाच प्रेक्षणीय स्थळांची नावे लिहा.**

**शब्दार्थ .**

१.दाट घट्ट २.सहल - पर्यटन
३. जय्यत - जोरदार ४.पायथा - तळाकडील बाजू
५. सुदृढ - निरोगी ६.अपवाद - वेगळेपणा
६. जंकफूड - पौष्टिक सत्वांचा अभाव असलेले पदार्थ.

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.**

१. विनित आणि अनिकेत यांनी आपल्या डब्यामध्ये काय खाऊ आणला होता?

**उत्तर -** विनितने आपल्या डब्यामध्ये शिरा व सफरचंद आणले तर अनिकेतने वेफर्सचे मोठे पाकीट आणले होते.

२. डोंगर चढताना मुलांची काय अवस्था झाली? त्याला अपवाद कोण ठरला?

**उत्तर -** जसे जसे मुले वर चढत होती तसतसा त्यांचा उत्साह कमी कमी होत होता.बरेच जन थांबत थांबत चढू लागले.काहीजण तर पाणी पीत होते.डोंगर चढायचा उत्साह फारच थोड्या मुलांमध्ये शिल्लक राहिला. त्याला अपवाद फक्त विनित होता.

३. विनित का थकला नाही?

**उत्तर -** विनित अजिबात जंकफूड खात नाही.आईने केलेले पदार्थ कुरकुर न करता मनापासून खातो.त्यामुळे त्याचे शरीर सुदृढ आहे.
दररोज सकाळी तो व्यायाम करतो.त्यामुळे त्याला थकवा येत नाही.

४. अनिकेत सर्वात मागे का राहिला?

**उत्तर -** अनिकेतने भल्यामोठ्या पाकिटातले वेफर्स खात होता.तसेच तो दररोज व्यायाम करत नव्हता त्यामुळे त्याला लवकर थकवा आला व मागे राहिला.

५. सरांनी मुलांना काय समजावले?

**उत्तर -** सरांनी मुलांना समजावले , " दररोज व्यायाम केलात,पौष्टिक अन्न खाल्ले तर तुम्ही पण न दमता डोंगर चढू शकाल.कधीतरी बदल म्हणून वेफर्स,बिस्कीट खायला हरकत नाही पण संपूर्ण जेवण म्हणून नाही."

**प्रश्न २. पुढील वाक्यांचे काळ ओळखा?**

१. मुले सकाळी सात वाजता हजर झाली. **काळ** = भूतकाळ
२. त्यामुळे त्यांचे शरीर सुदृढ आहे. **काळ** = वर्तमानकाळ
३. तुम्ही त्याच्यासारखे दररोज व्यायाम कराल व पौष्टिक अन्न खाल तर तुम्ही पण न दमता डोंगर चढू शकाल **काळ** = भविष्यकाळ

**प्रश्न ३. पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा.**

१. मैत्री = कोणताही स्वार्थ व अपेक्षा न ठेवता मैत्री करावी.
२. डोंगर = डोंगरामधून कोसळणारा धबधबा अतिशय सुंदर दिसत होता.
३. सुदृढ = सुदृढ शरीर आजारांना दूर ठेवते.
४. पौष्टिक = पौष्टिक अन्न खाल्ल्यामुळे शरीर सुदृढ व निरोगी बनते.

**प्रश्न ४. पुढील शब्दांपुढे त्यांचे योग्य लिंग ओळखून लिहा.**

१. डोंगर = पुल्लिंग २. टोपी = स्त्रीलिंग
३. शरीर = नपुंसकलिंग ४. विनित = पुल्लिंग ५. सर= पुल्लिंग

**Subject Teacher** **HOD** **Co-Ordinator** **Principal**